**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**
**Web: www.dhepune.gov.in E-mail: dhepune@yahoo.co.in**
**फोन नं. ०२०/ २६१२२११९, २६१२६९३९,** **फॅक्स नं. ०२० / २६११११५३**

क्रमांक- उशिसं/एकलव्य/नविनमंजूरी/२०१२-१३/१४अई. दिनांक-

**परिपत्रकः-**

प्रति,

१. कुलसचिव,
महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ,
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

**विषय — पदव्यूत्तर स्तरावर सन २०१२-१३ मध्ये शिक्षण घेत असणा-या विद्यार्थ्यांची एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेकरीता नविन मंजूरी व नुतनीकरण आवेदन पत्र सादर करणेबाबत.**

संदर्भ — १. शासन निर्णय क्र. एससीएच/१०९५/(८१)/मशि-४. दिनांक- ७ फेब्रुवारी १९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या विद्याशाखांतर्गत पदव्यूत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

**२/- आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात पदव्यूत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/९/२०१२ च्या आत विद्यार्थ्यांकडून विहित नमून्यात अचूक व परीपूर्ण आवेदनपत्रे सहपत्रीत भरुन व ते आपल्या स्तरावर तपासून मगच पाठविण्यात यावी. सदर प्रस्ताव स्वीकारण्याची अंतीम तारीख ३०/९/२०१२ असून त्यानंतर संचालनालयास उशिरा प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांचा विचारात केला जाणार नाही.**

सदर हे परीपत्रक व सुचनापत्रक अवेदनपत्र/वार्षीक प्रगती अहवाल व त्यासोबत जोडलेले **(नविन मंजूरी व नुतनीकरण अर्ज )** सहपत्रीत पत्रे जोडून पाठविण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपण आपल्या विभागाच्या मुखपृष्ठासोबत कार्यक्षेत्रातील आपल्या आखत्यामधील शासकीय अशासकीय

Said circular
down load on 15/6/2012 &
I discussed regarding circulation
with ASO Mr. Sunny.

महाविद्यालये यांना तात्काळ पाठवून आपल्या स्तरावरुन सदर महाविद्यालयांच्या कडून त्वरीत कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यात येवून, तसा त्याबाबतचा अहवाल तात्काळ या संचालनालयास पाठवावा.

याबाबत ब-याच प्रमाणात असे दिसून आले आहे, की महाविद्यालयामध्ये नविन मंजूरी व नुतनीकरणाचे आवेदनपत्रच मिळतच नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून विहित मुदतीत अर्ज पाठविणे शक्य होत नाही. व नंतर अर्धवट व घाई गरबडीत अर्ज भरुन महाविद्यालयामार्फत पाठविण्यात येतो. **किंवा अगदी विहित मुदतीत न पाठवता शेवटी शेवटी ३१ मार्च पर्यंत पाठविले जातात. आणि अशा वेळेस शासनास सदर विद्यार्थ्यांची आकडेवारी कळविण्याकरीता अडचण येऊन त्याबाबत बजेट किती मागववयाचे याबाबत संभ्रम निर्माण होतो.** असे होऊ नये म्हणून व विद्यार्थी एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेपासून वंचीत राहू नये म्हणून आवेदनपत्र परिपूर्ण भरुन विहित लागणा-या कागदपत्रांची पूर्तता करुन तात्काळ विहित दिलेल्या मुदतीत **दिनांक -३०/९/२०१२ च्या आत या संचालनालयास स्पीड पोस्टाने अथवा खास दुता करवी. देणे आवश्यक आहे.** सदर विद्यार्थ्यांचे अवेदनपत्रे विहित मुदतीतच्या आत या संचालनालयास आपल्यास्तरावरुन तपासून मगच दिलेल्या टेबलमध्ये माहिती भरुन नविन मंजूरी व नुतनीकरण असे वेगवेगळया प्रकारे अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांची पूर्तता करुन आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयाच्या मुखपृष्ठासोबत देण्यात याव्यात. याकरीता दिलेल्या सुचनांचा काटेकोरपणे अभ्यास करुन अर्ज तपासावेत याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रर चालणार नाहीत. याबाबत विभागीय स्तरावरुन सबंधीत काम करणा-या विद्यापीठ/महाविद्यालयांना सुचना देण्यात याव्यात. **यापुढे विद्यार्थ्यांच्या अर्जामधील कोणत्याही प्रकारे त्रूटी कळविल्या जाणार नाहीत. व अपूर्ण भरुन पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. करीता आपल्या स्तरावरुन तपासून पात्र अर्जच या कार्यालयास पाठविण्यात यावेत. सदर एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेपासून कोणी विद्यार्थी वंचीत राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी सबंधीत विद्यापीठ/महाविद्यालयाची राहील. नविन मंजूरी अर्ज परीपूर्ण अर्ज भरण्याबातच्या सुचना सुचनाफलकावर लावून सबंधीत विद्यार्थ्यांना विहित मुदतीतच (दि. ३०/९/२०१२) च्या आत व नुतनीकरण अवेदनपत्र ३१/८/२०१२ पूर्वी या कार्यालयास प्राप्त होतील याबाबतची नोंद घेऊन तशा सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.**

एकलव्य आर्थिक सहाय्य योजना शिषवृत्तीबाबत विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकारुन आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयाकडून तसेच्या तसे संचालनालयास पाठविले जातात. अशावेळेस विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये तृटी आढळून येतात. व तृटी कळवूनही तृटींची पूर्तता विहीत मुदतीत आपणाकडून होत

नसल्याने, विद्यार्थ्याला एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ मिळाला जात नाही. त्याकरीता परीपत्रक मिळताच सुचना फलकावर किंवा वर्गनिहाय परिपत्रक पाठवून विद्यार्थ्यांना कळवून नियम अटी तसेच विहित दिलेल्या मुदतीच्या आत विद्यार्थ्यांकडून परीपूर्ण अर्ज भरुन आपल्या स्तरावर त्याची छानणी करुन तपासून मगच अर्ज आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयाच्या मुखपृष्ठासोबत सदर विद्यार्थ्यांची सिरीयल नंबर नुसार एकत्रित विद्यार्थ्यांची यादी तयार करुन दोन प्रतित पाठवायची आहे. अर्ज भरताना काही प्रमुख अटी खाली दिलेल्या आहेत त्याप्रमाणे तपासून मगच आवेदनपत्र परिपूर्ण भरुन या संचालनालयास पाठववयाचा आहे.

करीता ब-याच प्रमाणात विद्यार्थ्यांकडून नविन मंजूरी व नुतनीकरणासाठीचे अर्ज परिपूर्ण भरण्याकरीता काही मुद्दे राहून गेलेले असतात. आणि अर्ज अपात्र होण्याची शक्यता असते. त्यासाठी खालील दिलेले ठराविक मुददयांचा सबंधीतंनी वाचून त्याप्रमाणे अर्ज तपासून परिपूर्ण भरुन मगच **मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण मध्यवर्ती इमारत महाराष्ट्र राज्य पुणे-१** या पत्त्यावर दिलेल्या विहित मुदतीत दि.३० सप्टेबर२०१२ च्या आत पाठववयाचे आहेत.

**नविन मंजूरीकरीता अर्जाबाबत विहित अटी.**

१. अर्जामधील पृष्ठ क्र १, २, ३, ४, ५, ६, परीपूर्ण भरावेत पृष्ठ क्र.१ वरील मुददा क्र.(३) मधील ब वडीलांचा/पालकांचा व्यवसाय(व्यवसाय न चूकता नमूद करण्यात यावा.) व्यवसाया नुसार दाखला.

२. पृष्ठ क्र.३ व ४ सबंधीत विद्यार्थ्याच्या आई-वडीलांनी/पालकांनी सादर करावयाचे उत्पन्नाविषयक प्रतिज्ञापत्र परिपूर्ण भरुन नोटरी पब्लीक/प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी/सक्षम सहसूल अधिकारी सही शिक्का असणे आवश्यक आहे.

३. पृष्ठ क्र ५ मध्ये वडीलांचा पृष्ठ क्र.१ वरील मुददा क्र.(३) मधील ब प्रमाणे जर व्यवसाय असल्यास व्यवसाय व भागीदारीपासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाणपत्र परीपूर्ण भरुन सक्षम आयकर अधिकारी यांची सही शिक्का आवश्यक. जर शेती असेल तर शेतीपासून मिळणा-या उत्पन्नाचे प्रमाणपत्रावर जिल्हाधिकरी/तहसीलदार यांची सही शिक्का आवश्यक.

४. पृष्ठ क्र.६ मधील रुजू अहवाल परीपूर्ण भरुन प्राचार्य/विद्यापीठ विषय विभागप्रमुख यांची सही शिक्का तसेच संपूर्ण नाव नमूद करणे आवश्यक आहे.

५. अर्जासोबत बी.ए. बी.कॉम. बी.एस्सी थर्ड वर्षाची आटेस्टेड केलेली चालू वर्षामध्ये पदवी परीक्षा उतीर्ण झाल्याची गुणपत्रीका जोडणे आवश्यक आहे.

६. बी. ए. बी. कॉम. पदवी परीक्षेमध्ये थर्ड वर्षाकरीता किमान ६० टक्के गुण किंवा त्याआधिक असणे आवश्यक आहे.

७. बी. एस्सी पदवीपरीक्षेमध्ये थर्ड वर्षासाठी किमान ७० टक्के गुण किंवा त्याआधिक असणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थ्यांच्या वडिलांचे उत्पन्नाविषय दाखला त्यामध्ये वार्षीक उत्पन्न किमान ७५ हजार किंवा त्याआतील असावे.

९. अर्जासोबत विद्यार्थ्याचा रहिवाशी दाखला, राष्ट्रीयत्वाचा दाखला आवश्यक.

१०. बी.ए. बी.कॉम. बी.एस्सी एल. एल. बी. च्या चालूवर्षी फ्रेश उतिर्ण असणा-या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो.

११. डी. एड. बी. एड. एम.एड. एम. सी.ए. बी.सी.एवगैरे अशाप्रकारे व्यवसायीक कोर्स असणा-यांना विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.

१२. विद्यार्थी अंशतः किंवा पूर्णतः सेवेत असता कामा नये असल्यास शिष्यवृत्ती लाभ दिला जात नाही.

१३. विद्यार्थी इतरत्र कोणतीही शिष्यवृत्ती घते असल्यास अशा विद्यार्थ्यास एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ दिला जात नाही.

१४. विद्यार्थ्यांनी ज्या ज्या वर्षी उतीर्ण होईल त्या त्या वर्षीच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचे अवेदनपत्र भरुन नविन मंजूरी व नुतनीकरणा लाभ घेतला पाहिजे.

१५. या योजनेचा लाभ हुशार गरीब होतकरु विद्यार्थ्याकरीता असल्याने नियमित शाळेत उपस्थिती व सभ्य वर्तणूक पाहिजे असल्याने विद्यार्थ्याने एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेत असता, त्याच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारे गॅप अथवा खंड नसावा. अशा वेळेस मागील वर्षाची गुणपत्रीका चालू वर्षाच्या अर्जा सोबत न देता ज्या

वर्षामध्ये विद्यार्थी पदवी परीक्षा उतीर्ण होईल त्या वर्षामध्ये विद्यार्थ्याने एकलव्य आर्थिक सहाय्य योजना शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन लाभ घेणे आवश्यक आहे.

**नुतनीकरणासाठीचा अर्जः-**

१. विद्यार्थ्याने नुतनीकरणासाठी अर्ज विहित नमुन्यामध्ये (पृष्ठ क्र. १) मध्ये परिपूर्ण भरुन त्यामध्ये त्यासोबत चालू वर्षामधील एम.ए. भाग-१ एम. कॉम भाग-१. एम.एस्सी भाग-१ नुसार ज्या शाखेत विद्यार्थी उतीर्ण झालेला आहे. त्या शाखेमधील किमान ५० टक्के किंवा त्याअधिक गुण असलेली गुणपत्रीका आटेस्टेड करुन नुतनीकरण अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्गातील उपस्थितीची टक्केवारी किमान ७५ टक्के किंवा त्याअधिक असणे आवश्यक आहे.

३. अर्ज परीपूर्ण भरुन अर्जाच्या शेवटी प्राचार्य/विद्यापीठ विषय विभागप्रमुख यांची सही शिक्का तसेच संपूर्ण नाव नमूद करणे आवश्यक आहे.

४. एटी केटी ने उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती दिली जाणार नाही.

५. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु ५०००/- प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

उपरोक्त सदर दिलेले मुददे संबंधीत विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर बारकाईने पाहून त्यानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज प्राप्त करताना तपासून मगच **मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण मध्यवर्ती इमारत महाराष्ट्र राज्य पुणे -१ या पत्त्यावर दिलेल्या विहित मुदतीत दि. ३० सप्टेबर २०१२ च्या आत आपल्या विद्यापीठ/महाविद्यालयाच्या मुखपृष्ठासोबत पाठवावयाचे आहेत.** दिलेल्या विहित मुदतीत नंतर संचालनालयास प्राप्त झालेल्या आर्जांचा विचार केला जाणार नाही. याबाबत सबंधीत विद्यार्थ्यांना सुचना देवून त्यांच्या कडून सदर अर्ज दिलेल्या मुदतीच्या आत प्राप्त करुन घेऊन नुतनीकरण व नविनीकरण असे एकत्रीतरित्या न पाठवता वेगवेगळे करुन अर्ज पाठववयाचे आहेत. तसेच **नुतनीकरणासाठी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज पाठविले जातील त्या विद्यार्थ्यांचे अर्जांमध्ये नविनीकरण मंजूर आदेशामध्ये दिलेला रजिस्टर क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.**

**त्यासाठी नविनमंजूरी तसेच नुतनीकरण तसेच विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेचे अकाऊंट व इतर माहिती दिलेल्या टेबलमध्ये भरुन अर्जाची छाननीकरुन आपल्या विद्यापीठ महाविद्यालयाच्या मुखपृष्ठासोबत विद्यार्थ्यांची यादी दोन प्रतित तसेच खालील दिलेल्या टेबलमध्ये काही ठराविक**

दिलेले मुददे अर्ज तपासून भरायचे आहे. <u>त्यानुसार सबंधीत काम करणा-या लिपीकांनी ते आपल्या स्तरावर तपासून विद्यार्थ्यांची नावांची यादी तयार करुन त्याच्यासोबत अर्ज टेबलसहित भरुन पाठविणे आवश्यक आहे.</u>

## नविन मंजूरीसाठी टेबल- १

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नांव | विद्यार्थ्याचा जात प्रवर्ग नमूद करावा. | पृष्ठ क्र-४ वर उत्पन्न विषयक प्रतिज्ञापत्रावर नोटरी पब्लीक सही शिक्का आहे/ नाही | खालील पैकी जो वर्ग असेल तो नमूद एम.ए भाग-१ एम.कॉम. भाग-१ एम.एस्सी भाग-१ | पदवी परीक्षेमध्ये मिळालेली टक्केवारी नमूद करावी | पदवी परीक्षेची उतीर्ण असलेली गुणपत्रीका आटेस्टेड आहे/नाही. ( ) अशी खूण करावी | वडीलांचे/पालकांचे चालू वर्षामध्यील वार्षीक उत्पन्न नमूद करावे. | विद्यार्थी, पालकांचे रहिवाशी व राष्ट्रीयत्वाचा दाखला अर्जा सोबत जोडलेला आहे/नाही. ( ) अशी खूण करावी | पृष्ठ क्र वरील अहवाल विभाग प्रमुखांचे सहीशिव आहे/ना ( अशी र करावी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |

नुतनीकरणासाठी टेबलः- २

टिपः- ( नुतनी करणाचे वार्षीक प्रगती अहवाल दि. १०/७/२०१२ च्या पूर्वी या संचालनालयास पाठवावीत)

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नांव | विद्यार्थ्याचा जात प्रवर्ग नमूद करावा. | वर्ग- खालीलपैकी जो असेल तो नमूद एम.ए.भाग- एम.कॉम.भाग- एम.एस्सी भाग- | परीक्षेमध्ये मिळालेली टक्केवारी नमूद करावी | उतीर्ण असलेली गुणपत्रीका आटेस्टेड आहे/नाही. ( ) अशी खूण करावी | वर्गामधील उपस्थिती अर्जामध्ये नमूद केली आहे/नाही.. ( ) अशी खूण करावी. | अर्जाच्या शेवटी प्राचार्य/ विद्यापीठ विभाग प्रमुखांची सही शिक्का आहे/नाही. ( ) | विद्यार्थ्याची नविन मंज प्रथम वर्षा आदेशातील रजिस्टर क्रम नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६ | ७ | ८. | ९ |

टेबल क्रः-३ विद्यार्थ्याने स्वतःच्या नावाचे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे खाते उघडून खालील प्रमाणे माहिती अर्जासोबत भरुन तात्काळ संबंधीत विद्यापीठ/महाविद्यालयात देणे त्यानुसार सबंधीतांनी एकत्रित विद्यार्थ्यांची दिलेल्या तिनही टेबल प्रमाणे माहिती भरुन अर्जासोबत विहित दिलेल्या मुदतीच्या आत आपल्या विद्यापीठ/
महाविद्यालयाच्या मार्फत पाठविणे.

| अ.क्र | लाभार्थ्याचे नांव | बँकेचे नांव | लाभार्थीचा बँकेचा बचत खाते क्रमांक | बँकेच्या शाखेचा पत्ता | आय एफएस्सी कोड क्रमांक | मायकर कोड क्रमांक. | विद्यार्थ्याचा मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

प्रशासन अधिकारी,(उच्च शिक्षण)

शिक्षण संचालनालय शिष्यवृत्ती

शाखा १४ अई
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.